अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 25 सप्टेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 06 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# १० ऑक्टोंबरचा ओबीसी-व्हीजेएनटी मोर्चा अविस्मरणीय ठरणार!

## ब्रम्हपुरीत सकल ओबीसी संघटनांची बैठक उत्साहात संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी समाजाच्या अस्तित्वाचा तसेच आरक्षण, शिक्षण, नोकरी आणि राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर येथे १० ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या सकल ओबीसी महामोर्चाच्या पूर्वतयारीसाठी ब्रम्हपुरीतील स्वागत मंगल कार्यालयात तालुक्यातील विविध जातीय संघटनांची बैठक उत्साहात पार पडली. या वेळी ब्रम्हपुरी तालुक्यातील हजारो लोक नागपूरच्या महामोर्चात सक्रीय सहभाग घेणार असल्याची भूमिका एकमुखाने व्यक्त करण्यात आली व हा मोर्चा अविस्मरणीय ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

ओबीसी समाजाच्या प्रमुख मागण्यांमध्ये ०२ सप्टेंबर २०२५ रोजीचा मराठ्यांचे ओबीसीकरण करणारा अन्यायकारक काळा जीआर तात्काळ रद्द करावा, मराठा समाजाला खोटे कुणबी दाखले देण्याचे षडयंत्र थांबवावे व दिलेल्या बोगस दाखल्यांची चौकशी करून श्वेतपत्रिका काढावी, जातिनिहाय जनगणना तात्काळ सुरू करावी जेणेकरून ओबीसींची खरी लोकसंख्या निश्चित होईल, लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण, नोकरी, शिक्षण व राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, तसेच पुरेसा विकासनिधी देण्यात यावा आदींचा समावेश आहे.

बैठकीत उपस्थित बांधवांनी आपल्या परीने जे जे शक्य आहे ती मदत करण्याचे जाहीर केले. तसेच हा महामोर्चा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोचविण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी व्हावेत यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. १० ऑक्टोबर २०२५ रोजी नागपूर येथे होणाऱ्या सकल ओबीसी महामोर्चात सर्व समाज बांधव, महिला, विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. हा लढा अस्तित्वाचा आहे, म्हणून 'आपला मोर्चा समजून हजेरी लावणे आवश्यक आहे' असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## जेष्ठ आंबेडकरवादी नेते मारोतराव कांबळेंचे निधन



ब्रह्मपुरी/का.प्र.

विदर्भातील आंबेडकरवादी चळवळीचे नेते मारोतरावजी कांबळे यांचे मंगळवार, दि. २३ सप्टेंबर २०२५ ला सायंकाळी सात वाजता नागपूर येथील किंग्स वे हॉस्पिटलमध्ये दु:खद निधन झाले. ते ८८ वर्षाचे होते.

मारोतरावजी कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्यासोबत सन १९७२ मध्ये ब्रह्मपुरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स या महाविद्यालयाची स्थापना केली. मारोतरावजी कांबळे हे ब्रह्मपुरी येथील आंबेडकरी चळवळीतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते. संपूर्ण विदर्भात शिक्षण आणि सामाजिक प्रबोधनाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तळागळा पर्यंत पोचविण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. शोषित, वंचित ,पीडित लोकांना न्याय मिळवून देण्याचं कार्य त्यांनी अविरत केले.

त्यांच्या जाण्याने रिपब्लिकन पक्षाची फार मोठी हानी झाली आहे.ब्रह्मपुरी परिसरात एक सांस्कृतिक, सामाजिक, राजकिय आणि शैक्षणिक व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

त्यांच्या मागे मुलगा प्राचार्य डॉ. देवेश कांबळे, डॉ. राजेश कांबळे, मुली, नातवंडे व बराच मोठा मित्रपरिवार आहे. त्यांना ब्रह्मपुरी समाचार परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..

## रेती तस्करांवर महसूल विभागाची कारवाई



(फाईल फोटो)

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील नान्होरी येथे अवैधरीत्या रेतीची वाहतूक करणाऱ्या तस्करांवर महसूल विभागाने गुन्हा दाखल केला आहे. २२ सप्टेंबर रात्री जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील नान्होरी येथे अवैधरीत्या रेती उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या वाहनांवर धाड टाकण्यात आली.

या कारवाईत सर्वेश काळे (रा. नागभीड) यांच्या मालकीची जेसीबी (क्रमांक एमएच ३४/एपी १८४९), राकेश भेंडारे (रा. नान्होरी) यांच्या ट्रॅक्टर, प्रवीण नथमल दोनाडकर (रा. दिघोरी) यांच्या ट्रॅक्टर, तसेच सचिन वाघमारे (रा. नागपूर) यांच्या मालकीचे हायवा (क्रमांक एमएच ३५/एजे ३१०६) जप्त करण्यात आले. या यंत्रसाधनांना ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात जमा केले गेले. या कारवाईत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६च्या कलम ४८ (७) (८) अंतर्गत गुन्हा नोंदवून वाहनमालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. ही कारवाई उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात तहसीलदार सतीश मासाळ, मंडळ अधिकारी नरेश बोधे, ग्राम महसूल अधिकारी हिमांशू पाजनकर आणि स्वप्निल इसड आदींचा सहभाग होता.



## संपादकीय...

# अशोभनिय टाळाटाळ

एखाद्या संवैधानिक संस्थेला पुरेसे अधिकार दिले, ते अधिकार वापरण्याचं स्वातंत्र्य दिलं, तरीही त्या संस्थेने मिळालेलं स्वातंत्र्य ते अधिकार न वापरण्यासाठीच वापरायचं ठरवलं तर त्याला काय म्हणणार? अशावेळी संबंधित संस्थेला कार्यतत्पर करण्यासाठी जे जास्तीत जास्त करता येतं, तेच सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केलं. विषय आहे, महाराष्ट्रात दीर्घ काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा. या निवडणुका व्हाव्यात यासाठी अनेकजण अनेकवेळा न्यायालयात गेले; तसे निवडणूक प्रक्रियेतील मुद्द्यांचा पूर्ण खुलासा झाल्याशिवाय निवडणुका घेणं उचित नाही, हे सांगण्यासाठीही अनेकजण न्यायालयात गेले. जे प्रक्रियेतील स्पष्टीकरणासाठी गेले, त्यांचे मुद्दे अधिक गुंतागुंतीचे असल्याने त्या संबंधातील न्यायालयीन प्रक्रिया लांबत गेली, निकाल आले नाहीत; परिणामी, निवडणुकीची प्रक्रिया सुरू होऊ शकली नाही. ही वस्तुस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर न्यायालयाने २०१७ मध्ये ज्या सूत्राने निवडणुका झाल्या, त्याच पद्धतीने; पण न्यायालयासमोरील प्रलंबित प्रकरणांच्या निकालांच्या अधीन राहून निवडणुका घ्या', असा आदेश मे महिन्यात दिला. त्या आदेशातच ऑक्टोबर अखेरपर्यंत निवडणुका घेण्याचे निर्देशही दिले होते. पण, प्रत्यक्षात राज्य निवडणूक आयोगाने अपेक्षित वेगाने प्रक्रिया न राबवल्याने आता न्यायालयाला जानेवारी २०२६ पर्यंतची मुदत द्यावी लागली आहे.

गेल्या वेळी मुदत देऊनही निवडणूक आयोग अपेक्षित गतीने न हलल्याने न्यायालयाने यावेळी निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाच्या टप्प्यांचं वेळापत्रकच आखून दिलं आहे. काही मुद्द्यांबाबत स्पष्टीकरणाची गरज भासलीच, तर त्यासाठी येत्या दीड महिन्यांत येण्याची मुदतही दिली आहे. न्यायालयाने एवढी आग्रहाची भूमिका घेतल्याने जानेवारीअखेरपर्यंत निवडणुका होतील, अशी आशा करायला आता हरकत नाही. केवळ आशाच करावी लागते आहे, कारण निवडणूक आयोगाचा मंगळवारीही न्यायालयात फारसा उत्साह नव्हता. सणासुदीपासून शालेय महाविद्यालयीन परीक्षांपर्यंत असंख्य कारणं पुढे करत आयोग जानेवारीअखेरची मुदत स्वीकारायलाही नाखूश होता. आयोगाची भूमिका जर अशीच असेल, म्हणजे सरकारलाही या निवडणुका घेण्याविषयी अगत्य नसेल, तर त्या आणखी पुढे ढकलण्यासाठी असंख्य सबळ कारणे उपलब्ध आहेत. त्यातलं कुठलंही कारण पुढे करून, कदाचित न्यायालयीन पेचाचंच उदाहरण देऊनही निवडणुका आणखी पुढे नेल्या जाऊ शकतात.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी मंगळवारी हे प्रकरण ज्याप्रकारे हाताळलं, आयोगाला धारेवर धरत जे निर्देश दिले, ते या शंकेला आधार देणारेच होते. पाच वर्षांपेक्षा अधिक काळ स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार पूर्णपणे अधिकाऱ्यांच्या हाती असून विविध विकासकामे किंवा मोठे प्रकल्प मंजूर करताना जी प्रक्रिया पार पाडली जाते आहे, ती हास्यास्पद आहे. लोकप्रतिनिधींच्या किंवा अतिस्थानिक हितसंबंधांमुळे विकासकामांत अडथळा येतो, गैरव्यवहारांची शक्यता वाढते अशी तक्रार करणाऱ्यांनी गेल्या पाच वर्षातला जनतेचा अनुभव काय आहे, गेल्या पाच वर्षांत गावागावात किती सुधारणा झाल्या, हे एकदा जनतेत जाऊनच विचारलं पाहिजे. या निवडणुकांची टाळाटाळ सुरू आहे, ती केवळ राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी. स्थानिक लोकप्रतिनिधी नसतील, तर आमदार आणि सरकारमधील संबंधितांना अधिकाऱ्यांमार्फत कारभार करता येतो. पुन्हा निवडणुकीत स्थानिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे निकाल लागण्याची शक्यता असते, नव्या स्थानिक आघाड्या जन्म घेऊ शकतात. हे सगळं टाळण्याचा सर्वात सोपा उपाय निवडणुका टाळण्याचाच असतो. न्यायालयाच्या या निकालाने त्याला आता कसा प्रतिबंध होतो, ते पाहावं लागेल. भारतीय लोकशाही राज्यव्यवस्थेच्या त्रिस्तरीय रचनेत स्थानिक स्वराज्य संस्थांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या संस्था म्हणजे एकार्थाने लोकशाही व्यवस्थेचा नांगरच आहेत. हा नांगर भक्कम आणि स्थिर राहिला, तरच वरचं जहाज स्थिर राहतं, हे लक्षात घेऊन निवडणुका वेळेत होणंच सगळ्यांच्या हिताचं आहे.

# 'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमाला गतिमान करा - डॉ. सुभाष शेकोकर

## ने.हि. महाविद्यालयात 'अहिंसा पंधरवाडा' कार्यक्रम



ब्रम्हपुरी/का.प्र.

परमपुज्य महात्मा गांधी यांनी आपल्या जीवनात सामाजिक मूल्यांना खुप महत्व दिले. देशाला अहिंसेबरोबर स्वच्छतेचा संदेश दिला. हाच संदेश आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्वच्छता हीच सेवा' म्हणजे स्वच्छता करणे ही समाज व देश सेवा आहे, असा मोलाचा सल्ला अहिंसा पंधरवाडा या उपक्रमातून दिला आहे. नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातर्फे आयोजित अहिंसा पंधरवाडा कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. सुभाष शेकोकर प्राचार्य ने.हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता हीच सेवा उपक्रम प्रत्येकाने आपल्या घरापासून सुरू करून परिसर, समाज व गाव असा स्वच्छतेचा विस्तार करीत या उपक्रमाला गतिमान करण्याचे आवाहन केले.

हा अहिंसा पंधरवाडा साजरा करतांना आपण ज्या शहरात राहतो तेथील आपल्या घरोसमोरील, भोवतालचा परिसर व सार्वजनिक ठिकाण हे स्वच्छता ठेवणे आणि स्वच्छता करणे ही आपल्या युवकांची व जनतेची जबाबदारी आहे. यामुळे प्रत्यक्ष स्वच्छतेचे धडे देण्यासाठी नगरपरिषद आणि बस आगार ब्रम्हपुरी या सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, प्लॅस्टिक निर्मूलन आणि वृक्षसंवर्धन जागृकतापर पथनाट्य सादर करुन स्वच्छता मोहिम राबविण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर यांनी स्वदेशी वस्तू व स्वच्छता अभियान यावर उपस्थितांना शपथ दिली.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ प्रकाश वट्टी यांनी केले. तर यात सहभागी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. दर्शना उराडे, डॉ. आशिष साखरकर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मानस गेडाम, कार्तीक गुरुनुले, तेजस डोनाडकर, स्वप्निल खेडेकर, युगम कुकडे, चिन्मयी मडावी, रोहिणी वाघाडे, नेहा ठाकरे, स्वाती कुत्तरमारे, नयन मेश्राम, अनिकेत शेंडे व स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

# ब्रम्हपुरीत भव्य रोगनिदान व उपचार शिबीर संपन्न

## 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियानाचे यशस्वी आयोजन

ब्रह्मपुरी/का.प्र.

केंद्र शासनाच्या 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' या अभियान अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी येथे दि.१९ सप्टेंबर २०२५ ला रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. नैना दुपारे सहा. संचालक हिवताप नागपूर, डॉ. भास्कर सोनारकर अति. जिल्हा शल्य चिकित्सक चंद्रपूर, डॉ. शितल सोनारकरआदी मान्यवर उपस्थित होते. प्रसंगी भाजपा महिला सेल च्या पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

या शिबिरात एकूण ७५९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यात ४३२ स्त्रींया व ३२७ पुरुषांची तपासणी करण्यात आली. NCD अंतर्गत १५६ स्त्रियां व ४२ पुरुष असे एकूण १९८ रुग्णांची रक्तदाब, शुगर, कर्क रोग यांची तपासणी करण्यात आली. १६८ स्त्रियांच्या गर्भाशयाच्या कर्क रोगाची तपासणी करण्यात आली. ४२ पुरुषांची मुख कर्क रोग तपासणी करण्यात आली. ५० रुग्णांची क्षय रोग एक्स रे काढण्यात आले. ६२ गरोदर महिलांची संपूर्ण तपासणी करण्यात आली. ४६ रुग्णांची सोनोग्राफी करण्यात आली. ७९ रुग्णांची डोळे तपासणी, ३३ रुग्णांची दंत रोग, १५७ रुग्णांना आयुष अंतर्गत सेवा प्रदान करण्यात आली. पंचकर्म अंतर्गत ५ व युनानी अंतर्गत १० रुग्णांना सेवा उपलब्ध करुन देण्यात आली. या शिबिरासाठी सेवा देण्याकरीता चंद्रपूर येथील जिल्हा रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून तज्ज्ञ डॉक्टर व कर्मचारी उपस्थित झाले होते.

सादर शिबिरात पोस्टरची प्रदर्शनी लावण्यात आली होती. अवयव दान जनजागृतीवर विशेष भर देण्यात आला होता. सदर शिबिराचे आयोजन डॉ. प्रितम खंडाळे वैद्यकीय अधिक्षक व त्यांच्या चमुने केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथील डॉ. निखिल डोकिरमारे, डॉ. श्रीकांत कामडी, डॉ. श्रीकांत नागमोती यांच्यासह डॉक्टर्स आणि कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## विनोदिनी

स्थळ : पुणे
वेळ दु. १ ते ४ मधली..
माझा एक मुंबईचा मित्र पुण्यात फिरत होता.
पुण्यात काहिही अशक्य नाही याची कल्पना असूनही एका बंगल्याचे नाव वाचून तो दचकलाच... 'टणक ऊस' ??? हे नाव का ठेवले असेल?
उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देईना. त्याने बेल मारलीच.
एका म्हाताऱ्याने दरवाजा उघडला.
'कायय्..? म्हातारा खेकसला
अहो ते... या बंगल्याचे नाव... 'टणक ऊस' का ठेवलय ?'
म्हातारा विस्कटलाच... हे विचारायला दुपारची झोप जाळलीत माझी ? भामटेगिरी आहे ही'...
मित्र : सॉरी... पण आता झालीच आहे झोपमोड तर सांगा ना.. 'टणक ऊस' काय प्रकार आहे?'
म्हातारा : निर्लज्ज आहात तुम्ही...
मित्र : ते झालंच पण 'टणक ऊस'....
म्हातारा : अहो... अक्षर जुनी झाली की तुटून पडतात..... सगळ्यांना माहिती आहे हे 'पाटणकर हाऊस' आहे....!!

# भन्ते विनाचार्य यांच्या धम्मध्वज जनसंवाद यात्रेला उसळला जनसागर

ब्रम्हपुरी/का.प्र.




संपुर्ण भारतात भन्ते विनाचार्य व भन्ते आकाश लामा यांच्या नेतृत्वात सुरु असलेल्या बौध्दगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ २० सप्टेंबर ला ब्रम्हपुरी येथे धम्मध्वज महारॅली व सभा मोठ्या उत्साहात पार पडली. या रॅलीचे प्रमुख नेतृत्व भन्ते विनाचार्य यांनी संपुर्ण ब्रम्हपुरी वासीय बौध्द समाज बांधवांना १२ फेब्रुवारी ला दिल्ली येथे होणाऱ्या विशाल आंदोलनात सहभागी होण्यास सुचना दिली.

या जनसंवाद यात्रेला भानतेजी सोबत एक महिन्या पासून प्रामुख्याने गोपाल रायपुरे सावली तर किशोर गजभिये नागपूर यांनी अथक परिश्रम घेतले. तालुक्यातील हजारो समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानिमित्याने महाबोधी महाविहार मुक्त करो च्या घोषणा देऊन सरकारला जागं करण्याचा व घेरण्याचा प्रयत्न करण्यात आला. राजकीय व वैयक्तिक हेवेदावे विसरुन संपुर्ण बौध्द समाज यावेळी या आंदोलनाच्या समर्थनासाठी एकवटला. या कार्यक्रमाला डॉ. प्रेमलाल मेश्राम, अशोक रामटेके, ॲड.नंदा फुले, सुधाकर पोपटे, राजेश कांबळे, चहांदे साहेब PWD, डॉ मंदीधरा सुखदेवे वैद्यकीय अधिकारी, रहाटे मॅडम, प्रमोद मोटघरे, रवि मेश्राम, राजकुमार शेंडे, डॉ राहुल मेश्राम यांनी मोलाचे आर्थिक सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी-तेसाठी लिलाधर वंजारी, विजय रामटेके, प्रभु लोखंडे, झगडीदास रामटेके, विहार मेश्राम, डी के मेश्राम, राजाभाऊ खोब्रागडे, विलास मेश्राम, चिरंजी वासनिक, यशवंत मेश्राम, प्रतिभा डांगे, निशा बनकर, सुकेशनी बन्सोड, करुणा मेश्राम यांनी मोलाची कामगिरी बजावली. कार्यक्रमाचे संचालन डी.एम.रामटेके यांनी केले तर उपस्थितांचे आभार नरेश रामटेके यांनी मानले.


# एलएमबी स्कुलमध्ये दंतचिकित्सा तपासणी शिबीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे २०









सप्टेंबर २०२५ रोज शुक्रवारला प्रि-स्कुल विभागामध्ये Dental Hygiene तपासणी शिबिर घेण्यात आला. या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांकडून प्रत्येक विद्यार्थ्याची वर्ग तुकडीनिहाय दातांची तपासणी करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना दातांचे आणि हिरड्यांचे विकार सर्वसामान्य झाले आहेत. दातांची योग्य प्रकारे काळजी घेण्या संदर्भात काही महत्वाच्या बाबींकडे आवर्जून पाहायला हवे असे दंतचिकित्सक डॉ. सागर आखाडे सर यांनी सांगितले. दातांच्या विकाराला कारणीभूत अनेक गोष्टी आहेत. हे डॉक्टराद्वारे सांगण्यात आले. अति प्रमाणात खाल्ल्यामुळे लहान मुलांचे दात लवकर किडतात. दात किडून वेदना होऊ लागतात व निट काही खाऊ शकत नाही. यावर सोपा उपाय म्हणजे त्यांना सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी ब्रश कशाप्रकारे घासायचे हे सर्व तज्ञ डॉक्टराद्वारे मुलांना सांगण्यात आले. ज्या मुलांचे दात किडले आहे. अशा विद्यार्थ्यांच्या पालकांना मुलांच्या उपचाराबाबत कळविण्यात आले

कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम आणि पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम प्रामुख्याने उपस्थित होत्या. प्री-स्कुल च्या शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी याकामी मोलाची मदत केली.

# विद्यार्थ्यांच्या हितासाठी विद्यापीठाच्या परिक्षा पुढे ढकला

## स्टूडेंट राईट्स एसोसिएशनचे कुलगुरुंना निवेदन



ब्रम्हपुरी/का.प्र.

विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन परीक्षा ढकलण्याची मागणी स्टूडेंट राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया, शाखा ब्रम्हपुरीच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे. दि. १८ सप्टेंबरला असोसिएशनच्या प्रतिनिधींनी मा. कुलगुरूंना निवेदन देऊन ही मागणी अधिकृतपणे नोंदवली.

सध्या विद्यापीठांतर्गत प्रवेश प्रक्रिया सुरू असून अनेक विद्यार्थी अद्याप नोंदणीच्या प्रतिक्षेत आहेत. अशा परिस्थितीत विद्यापीठाने परीक्षा जाहीर केल्यामुळे महाविद्यालयांना अभ्यासक्रम पूर्ण करणे अशक्य झाले आहे. अभ्यासक्रम नीट शिकवला गेला नाही तर विद्यार्थ्यांच्या भविष्यास गंभीर धोका निर्माण होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले. असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, परीक्षेची घाईघाईत घेतलेली तयारी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम करेल. विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या सशक्त व्हावेत, हेच आमचे ध्येय असून त्यासाठी विद्यापीठाने परीक्षेच्या तारखा पुढे ढकलाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

निवेदन देतांना स्टूडेंट राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया, ब्रम्हपुरी शाखेचे अध्यक्ष आदित्य बोरकर, सचिव प्रियशील चंदनखेडे, उपाध्यक्ष शरद बारसगाडे, कोषाध्यक्ष सिद्धेश्वर भोयर तसेच कार्यकारिणी सदस्य नीलेश लाकडे, अविनाश अवसरे, तेजस मेश्राम, युगांक वाकडे, करण ठवरे, सार्थक बारसागडे उपस्थित होते.

# सलग तिसऱ्या वर्षी ट्विंकल इंग्लिश स्कुलचा विभागस्तरावर डंका

## खो-खो स्पर्धेत स्कुलच्या विद्यार्थीनी जिल्हास्तरीय स्पर्धेत अव्वल

नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल



इंग्लिश स्कूल, नागभीड या शाळेच्या विद्यार्थिनींनी क्रीडा क्षेत्रात आणखी एक मोठी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा स्तरीय आंतरशालेय खो-खो स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळ करीत विभागीय स्तरावर आपली निवड निश्चित केली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद चंद्रपूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा १९ वर्षांखालील विद्यार्थिनींसाठी दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी चंद्रपूर येथे पार पडली. विशेष म्हणजे, सलग तिसऱ्या वर्षी ट्विंकल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींनी जिल्हा स्तरावर यश संपादन करत विभागीय स्पर्धेत आपली निवड मिळवली आहे. या सातत्यपूर्ण यशामुळे शाळेचा मान व क्रीडा क्षेत्रातील प्रतिमा अधिक उज्ज्वल झाली आहे.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर, सचिव अजय काबरा, शाळेच्या प्राचार्या शुभांगी पोहेकर मुख्याध्यापिका संगीता नारनवरे, क्रीडा शिक्षक गणेश लांजेवार, महेश जीभकाटे, क्रीडा शिक्षिका रूपा ताडूरवार, शिक्षकवर्ग यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३१५

# सावंगीतील बुल्ले कुटूंबियांची सव्वाशे वर्षापासून मकराच्या बैलांची परंपरा

## पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी मकराच्या बैलांची मिरवणूक व विविधांगी कार्यक्रम

देसाईगंज/प्रतिनिधी

देसाईगंज तालुक्यातील सावंगी येथील बुल्ले कुटुंबीय दरवर्षी पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी मकराच्या बैलांची मिरवणूक काढण्याची परंपरा जोपासत आहे. सदर परंपरेला सव्वाशे वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटला आहे. पूर्वजांनी सुरू केलेल्या परंपरेला तडा न जाऊ देता, या वर्षी सुद्धा बुल्ले कुटुंबीयांनी आपल्या पूर्वजांना स्मरण करत ही परंपरा सुरू ठेवली होती. सर्वपितृ अमावस्येच्या दिवशी विविधांगी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.



देसाईगंज तालुक्यातील सावंगी येथील बुल्ले कुटुंबीयांनी सांगितलेल्या माहितीनुसार, इंग्रजकालीन राजवटीत बुल्ले कुटुंबीय जमीनदार होते. मुळचे लाडज (ब्रह्मपुरी) येथील रहिवासी असलेले बुल्ले कुटुंबीय कालांतराने सावंगी येथे स्थायीक झाले. स्वातंत्र्यानंतर बुल्ले कुटुंबियांकडे पाटीलकी आली. त्यामुळे बुल्ले कुटुंबीयांकडे ग्रामस्थांचा नेहमी वावर असायचा. पाटील म्हणून दानशूर व्यक्तिमत्व असलेल्या पूर्वजांनी जनकल्याणाचे अनेक कार्य केले. पूर्वीच्या काळी शेतीच्या कामातून गावकऱ्यांना उसंत मिळाल्यानंतर करमणूक म्हणून रात्रीच्या वेळेस लोक गावातील बुल्ले कुटुंबीयांच्या घरी एकत्र येत भजन, कीर्तन, देवाच्या नावाचा जप, भक्ती गीते गात असत. त्यावेळेस बुल्ले कुटुंबीयांच्या पूर्वजांनी हिंदू धर्मातील धार्मिक कार्यांना महत्त्व देत सामाजिक एकोपा वाढविण्यासाठी मकराच्या बैलांची मिरवणुक काढण्याची परंपरा सुरू करण्याचा संकल्प केला.

हिंदू धर्मात पितृ मोक्ष अमावस्येला अनन्य साधारण महत्व आहे. सर्वपितृ अमावस्येला पितृपक्षाचा शेवट होतो. पितृपक्षात आपल्या पितरांचे श्राद्ध करण्याची पद्धत असते. यामुळे पितृदेवांचे आशीर्वाद मिळतात व पितृदोष देखील दूर होतो. त्यामुळे बुल्ले कुटुंबियांच्या पूर्वजांनी पुढाकार घेत पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी मकराच्या बैलांची मिरवणुकीची परंपरा सुरू केली. त्यावेळेस लाकडांचे बैल घडविण्यात आले होते. तत्कालीन काळी अभंग, भजन, कीर्तन, गोपालकाला व गाव जेवणाची सोय बुल्ले कुटुंबियांकडून होती. मकराचा बैल काढण्याची मिरवणूक रात्रभर चालत असेल. त्यावेळेस आकाशात पेटते आकाश कंदील (दुबारे) सोडले जात असत. आतिषबाजी केली जात असे. आजोबांनी सुरू केलेली परंपरा त्यांच्या वडील व वारसांनी अविरत सुरू ठेवली होती. त्यामुळे तीन पिढ्यांची ही परंपरा आजही सुरू असल्याची माहिती माधवजी बुल्ले यांनी दिली.

पूर्वजांनी सुरू केलेले परंपरा जपत बुल्ले कुटुंबीयांनी यंदा घरासमोरील आवारात भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.गावातील असंख्य महिला व पुरुषांनी एकत्र येत सदर मिरवणुकीत सहभाग नोंदविला होता. बुल्ले कुटुंबीयांच्या वतीने गावातील ग्रामस्थांना महाप्रसादाचे वितरण केले. सव्वाशे वर्षांपासून सुरू असलेली पितृमोक्ष अमावश्येच्या रात्री मकराच्या बैलांची मिरवणुकीची परंपरा माधवजी बुल्ले, घनश्यामजी बुल्ले, प्रभाकरजी बुल्ले व कुटुंबीय आजही जपत आहेत.

# अनाथ मुलींना मदत करून जपली सामाजिक बांधिलकी

## ओबीसी ॲक्टिव्ह महिला बचत गटाचा स्तुत्य उपक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

आपल्या उत्पन्नातून गरजवंताना हातभार लावून त्यांच्या आयुष्यात नवचैतन्य निर्माण करणासाठी धडपडणारे काही व्यक्ती आजही आहेत. याची साक्षात प्रचिती ओबीसी ॲक्टिव्ह महिला बचत गटांच्या समाजशील कार्यप्रणालीवरून दिसून येत आहे. या बचत गटाच्या सभासदांनी काही दिवसांपूर्वी वडिलांपाठोपाठ आईचे निधन होऊन अनाथ झालेल्या दोन मुलींना जीवनावश्यक उपयोगी वस्तू भेट देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे

तालुक्यातील हाकेच्या अंतरावर असलेल्या अऱ्हेर नवरगाव येथे काही दिवसांपूर्वी एक हृदय पिळवून टाकणारी दु:खद घटना घडली. ती म्हणजे ठेंगरी परिवारातील एक वर्षाची आणि सहा वर्षांची या दोन चिमुकल्यांचे छत्र हरपले. आधी वडील व नंतर दोन महिन्यांतच आईचे निधन झाल्यामुळे या कुटुंबातील आजी आणि आजोबांवर त्या चिमुकल्यांची जबाबदारी आली. अनेक संघटनांनी आपापल्या परीने या ठेंगरी परिवाराला आर्थिक मदत केली. अशीच छोटीसी मदत ओबीसी ॲक्टिव्ह महिला बचत गटातर्फे करण्यात आली. ठेंगरी कुटुंबातील दोन चिमुकल्यांना मायेचा आधार म्हणून गटातील महिलांनी १६ सप्टेंबर रोजी त्यांच्या गावी जाऊन त्यांना जीवनावश्यक वस्तू भेट स्वरूपात देऊन त्या कुटुंबाची सांत्वना केली. यात ओबीसी ॲक्टिव्ह महिला बचत गटातील सर्व सभासदांचे आर्थिक पाठबळ लाभले.

यावेळी ओबीसी ॲक्टिव्ह महिला बचत गटच्या वर्षा चौधरी, जयश्री कुथे, अल्का खोकले, प्रतिभा भोयर, रीना ठाकरे, वैशाली सामृतवार, कल्पना खोकले, पारसमणी दोनाडकर या उपस्थित होत्या.

# २६ व्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत पराग राऊतची नेत्रदिपक कामगिरी



ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र स्टेट वेटरंस एक्वॅटिक असोसिएशन आणि मास्टर्स एक्वॅटिक असोसिएशन छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने २६ वी राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा २०२५ चे आयोजन दिनांक १३ व १४ सप्टेंबर २०२५ ला सिद्धार्थ जलतरण तलाव छत्रपती संभाजी नगर येथे करण्यात आले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातून विविध जिल्ह्यांतील जवळपास ३५० जलतरणपटू सहभागी झाले होते.

चंद्रपूर जिल्ह्यातून ब्रह्मपुरी येथील पराग राऊत यांनी चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत सहभाग घेतला व राज्यस्तरीय स्पर्धेत गोल्ड व सिल्व्हर पदकांची यशस्वी कमाई करत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ब्रह्मपुरीचे नाव रोशन केले. पराग राऊत यांच्या यशस्वी कामगिरीने ब्रम्हपुरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ३० ते ३४ वर्षे वयोगटात पराग राऊत यांनी ५० मी. बटरफ्लाय मध्ये गोल्ड मेडल, ५० मी. ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये सिल्व्हर मेडल प्राप्त करत नेत्रदीपक यश संपादन केले आहे.

पराग राऊत हे ब्रम्हपुरीमध्ये जलतरणाची आवड असणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देत आहेत. पराग राऊत यांचे ब्रम्हपुरीत शिवार प्रतिष्ठान आहे. त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून व मित्रमंडळींकडून अभिनंदन केले जात आहे.

**झाडे लावा, झाडे जगवा**

# कन्हाळगाव येथील वृध्द इसमाचा भूतीनाल्यात बुडून मृत्यू

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील कन्हाळगाव येथे एक दुर्दैवी घटना घडली असून, गोकुळ मोतीराम मिसार (वय ७०) या वृद्धाचा भूतीनाल्यात बुडून मृत्यू झाला आहे. ही घटना शुक्रवारी घडली असून, शनिवारी सकाळी त्यांचा मृतदेह आढळून आला.

गोकुळ मिसार हे शुक्रवारी दुपारी नेहमीप्रमाणे गाई-शेळ्या चारण्यासाठी शेताकडे गेले होते, मात्र संध्याकाळपर्यंत घरी परतले नाहीत. त्यांच्या शेळ्या आणि गाई भूतीनाल्याजवळ सापडल्या, मात्र मिसार यांचा कुठेही पत्ता लागला नाही. त्यामुळे मुलगा अनिल मिसार यांनी पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. शनिवारी सकाळी गावातील स्थानिक ग्रामस्थ व नातेवाईकांनी शोधमोहीम राबवली. शोधमोहिमेदरम्यान बोंडेगाव शिवारातील भूतीनाल्यात त्यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला.

पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीनंतर नातलगांच्या स्वाधीन केला.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# ओबीसींचे अनेक दाखले बोगस: आम. वडेट्टीवारांचा महायुतीच्या मंत्र्यांवर गंभीर आरोप

ब्रम्हपुरी/का.प्र.

सरकारने काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या हक्काच्या आरक्षणाला धक्का लागला आहे. अनेक बोगस दाखले देण्यात येत आहेत. या सरकारमधील मंत्री, मोठे नेते हे बोगस दाखले देण्यासाठी प्रशासनावर दबाव टाकत आहेत, असा गंभीर आरोप काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. सरकारने काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, असे मुख्यमंत्री आणि ओबीसी उपसमितीतील मंत्री सांगत असले तरी ओबीसींच्या हक्कावर गदा येत आहे. म्हणूनच हा शासन निर्णय रद्द व्हावा, यासाठी सकल ओबीसी संघटनांचा महामोर्चाचे आयोजन नागपुरात करण्यात आले आहे, अशी माहिती वडेट्टीवार यांनी दिली.

नागपुरात १० ऑक्टोबर रोजी यशवंत स्टेडियम ते संविधान चौक असा सकल ओबीसी संघटनांचा मोर्चा निघणार आहे.



समाजातील कोणत्याही घटकाला आरक्षण द्यायचे तर जातिनिहाय जनगणना करणे आवश्यक आहे. सोबतच त्या-त्या समाजाच्या लोकसंख्येनुसार आरक्षण दिले पाहिजे. आता मात्र ओबीसींमध्ये मोठ्या प्रमाणावर घुसखोरी होणार आहे. असे असताना ओबीसींना धक्का कसा लागणार नाही, याचे स्पष्टीकरण सरकारने द्यावे, अशी भूमिका वडेट्टीवार यांनी मांडली. ओबीसींच्या हक्कासाठी लढायचे असल्यास प्रत्येकाने या मोर्चात सहभागी झाले पाहिजे. जे कोणी सरकारच्या शासन निर्णयाविरोधात आहेत, त्यांनी आपला पक्ष, संघटना यांपलीकडे जाऊन मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले.

**उपसमिती फक्त नावालाच :**

राज्य सरकारने नेमलेली उपसमिती कोणत्या कामाची नाही. इथे महाज्योतीचे पैसे मिळत नाही तिथे उपसमिती काय काम करणार, ओबीसींच्या हक्कासाठी काय लढणार', असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. एकीकडे मराठा समाजाच्या उद्योजकांना १३ हजार कोटी दिल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगतात. मग ओबीसी समाजासाठी, महामंडळासाठी किती निधी दिला, हे सरकारने सांगावे, सरकारने नेमलेली उपसमिती ही फक्त नावाला आहे, अशी टीकाही वडेट्टीवारांनी केली.

# नागपूर-नागभीड रेल्वेमार्ग पुर्णत्वास मिळणार गती

## शासनाकडून ४९१ कोटी ०५ लाख रूपयांच्या तरतुदीस मंजुरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

नागपूर येथील इतवारी ते नागभीडदरम्यानच्या ११६.१५ किलोमीटरच्या नॅरोगेज रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेज मार्गात रूपांतर करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (२३ सप्टेंबर) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य शासनाने आपला हिस्सा म्हणून रेल्वेला ४९१ कोटी ५ लाख रुपये देण्यास मंजुरी दिली. शासनातर्फे निधी मंजूर झाल्यामुळे निश्चितच इतवारी-नागभीड ब्रॉडगेज मार्गात लवकरच पूर्णत्वास येण्यास मदत होणार आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी यासाठी निवडक प्रकल्पांच्या खर्चाचा ४० ते ५० टक्के आर्थिक भार उचलण्याचे शासनाचे धोरण आहे. यापूर्वी नागपूर-नागभीड मार्ग नॅरोगेज होते.

त्यामुळे जलद वाहतुकीवर मर्यादा येत होती. डिसेंबर २०१९ मध्ये नॅरोगेज मार्ग ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याचे काम सुरू करण्यात आले. हा ब्रॉडगेज मार्ग भविष्यात नागभीड ते वडसा देसाईगंज आणि पुढे गोंदिया व गडचिरोलीपर्यंत विस्तारला जाणार आहे. यामुळे या भागातील जनतेला दळणवळणाचा मार्ग उपलब्ध होणार आहे. यामुळे नागपूर, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील रेल्वेचे जाळे सक्षम होण्यास मदत होणार आहे.

त्याचबरोबर या भागातील उद्योग आणि शेतकऱ्यांच्या विकासाला हातभार लागणार आहे. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडने (महारेल) इतवारी-नागभीड १ हजार ४०० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केला होता. यापैकी साठ टक्के कर्ज आणि चाळीस टक्के समभाग मूल्य यानुसार प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सद्य:स्थितीत इतवारी ते उमरेड हे ५५ किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून उमरेड ते भिवापूर काम अंतिम टप्प्यात आहे. याचा अर्थ इतवारी-नागभीड ब्रॉडगेज हा प्रकल्प सुमारे ८० ते ८५ टक्केपूर्ण झाला आहे. हा प्रकल्प पूर्ण व्हावा यासाठी महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडने सुधारित २ हजार ३८३ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे. सुधारित आराखड्यानुसार या प्रकल्पातील राज्य शासनाचा हिस्सा २० टक्क्यांवरून ३२.३७टक्के होणार आहे. यातील राज्य शासनाच्या हिश्श्याचे ७७१ कोटी ५ लाख रुपयांपैकी २८० कोटी रुपये यापूर्वीच देण्यात आला आहे. आता शासनातर्फे उर्वरित ४९१ कोटी ५ लाख रुपये महारेलला देण्यास मान्यता देण्यात आली. शासनातर्फे इतवारी-नागभीड ब्रॉडग्रेज मार्गासाठी निधी मंजूर करण्यात आल्यामुळे निश्चितच कामाला गती मिळेल आणि हा प्रकल्प त्वरित पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

# ख्रिस्तानंद विद्यालयाचा बास्केटबॉल संघ विभागस्तरावर

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपुर जिल्हास्तरीय बॉस्केटबॉल स्पर्धा ब्रम्हपुरी येथील



तालुका क्रिडा संकुल येथे जिल्हा क्रिडा अधिकारी पंधराम सर, माजी आमदार प्रा.अतुल देशकर, डॉ.देविदास जगनाडे, बॉस्केटबॉल संघटनेचे सचिव अश्विन चंदेल, तालुका क्रिडा अध्यक्ष भानारकर सर, विजय दिघोरे, आशिष कोसे, प्रकाश लोखंडे, प्रशिक्षक सि.पी.जेम्स, मयुर कामडी यांच्या उपस्थितीत नुकत्याच पार पडल्या.

यामध्ये ब्रम्हपुरी येथील ख्रिस्तानंद स्कुल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज च्या १४ वर्षाखालील मुलांच्या व मुलींच्या संघाने तसेच १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने अंतिम सामान्यात चंद्रपुर जिल्हातुन प्रथम क्रमांक प्राप्त केले असुन संघाची विभागस्तरीय बॉस्केटबॉल स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. प्रशिक्षक म्हणुन शाळेचे क्रिडा शिक्षक मिलिंद पाठक व गोविंद करंबे लाभले.

संघाच्या यशाबद्दल विद्यालयाचे व्यवस्थापक फादर कुरियन, मुख्याध्यापिका पावना, उपमुख्यध्यापिका सिस्टर अंजली तसेच सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विजेत्यांचे कौतुक केलेले आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# वासुदेव मैंद यांचे दुःखद निधन

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील निलज येथील वासुदेव शालिकराम मैंद (वय ५० वर्ष) यांचे दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास निधन झाले आहे. ते दैनिक सकाळ वृत्तपत्राचे पत्रकार राहुल मैंद यांचे वडील होत.



त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी आहे. त्यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम सकाळी ११ वाजता निलज येथील वैनगंगा नदीघाटावरील स्मशानभूमीत पार पडला. ह्या वेळी मोठ्या संख्येने आप्तस्वकीय उपस्थित होते.

**... QUOTES ...**

"Love your job but don't love your company, because you may not know when your company stop loving you."

- Dr. APJ Abdul Kalam

**चारोळी**

*ती आली आयुष्यात*
*मिळाले प्रमोशन...*
*ती गेली तणतणत,*
*मिळाले डिप्रेशन...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलमध्ये भव्य विज्ञान प्रदर्शनी










ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेद्वारा संचालित एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे दि. ०८ सप्टेंबर २०२५ रोजी SST विषयावर आधारित भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनीमध्ये वर्ग ३ ते ५ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध प्रकारच्या प्रतिकृती तयार केल्या यामध्ये स्कुलचे १५५ विद्यार्थी सहभागी झाले.

SST विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन विषयतज्ञ डॉ. वाकुळकर सर व कुमुदिनी मॅडम यांचे हस्ते पार पडले. प्रसंगी दोन्ही मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रदर्शनीमध्ये तिन्ही वर्गातील विद्यार्थ्यांना तीन विषय देण्यात आले. त्यामध्ये ३ री साठी Tiny Thinkers Competition, वर्ग ४ थी साठी Incredible State of India Competition, वर्ग ५ वी साठी Our Word Our Story या विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांचे आकर्षक प्रतिकृती जसे झोपडी, हाऊसबोट, वाळवंट, वायू प्रदुषण, स्मार्ट सिटी, ऋतू, लाल किल्ला, ज्वालामुखी पर्वत, इंडिया गेट, व्यापार आणि बाजार इत्यादी प्रकारांवर आधारित प्रतिकृती तयार केल्या. प्रतिकृतीची निर्मिती त्याचा उपयोग व त्यापासून होणारे फायदे, तोटे तसेच कार्यपध्दती याबाबतची माहीती विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवर तथा प्रदर्शनी बघणाऱ्यांना व विद्यार्थ्यांनी दिली.

याप्रसंगी एल. एम. बी. पब्लिक स्कुलचे संचालिका आशिता भैया मॅडम, स्कुलचे प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य राठी मॅडम, पर्यवेक्षिका झोडे यांनी SST विज्ञान प्रतिकृतीची पाहणी केली. प्रत्येक प्रतिकृती वेगवेगळ्या विषयाशी निगडित होती. विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट मॉडल्स बघून मान्यवरांनी मुलांचे विशेष अभिनंदन केले व विद्यार्थ्यांच्या कर्तुत्वाचा आलेख उंचावत राहण्यासाठी प्रोत्साहनपर मत नोंदविले. या कार्यक्रमासाठी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मेघा दुमाने यांनी केले.

# महसूल मंत्र्यांची महसूल सेवकांच्या आंदोलनाकडे पाठ

ब्रम्हपुरी/का.प्र.

विदर्भ महसूल सेवक संघटनेचे चतुर्थ श्रेणीच्या मागणीसाठी १० सप्टेंबरपासून संविधान चौक नागपूर येथे कामबंद आंदोलन व धरणे आंदोलन सुरू आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जिल्ह्यातच गत १० दिवसांपासून महसूलसेवक चतुर्थ श्रेणीच्या मागणीसाठी आंदोलन वाकरीता आसूनाही आंदोलनास्थळाकडे महसूलमंत्र्यांनी नागपूरमध्ये राहूनही पाठ फिरविली.

सदर महसूलसेवकाचे आंदोलन विविध मागण्यांसाठी नागपूर येथे सुरू आहे. मात्र महसूल मंत्री त्यांना भेटू शकत नाही, ही शोकांतिकाच आहे. राज्यातील १२ हजार ६०० महसूलसेवक आंदोलन करीत आहे. त्यांच्या आंदोलनामुळे तालुकास्तरीय महसुली कामे, डीएलसी, नैसर्गिक आपत्ती, संजय गांधी निराधार योजनेतील कामे, निवडणूक, पंधरवडा सेवा, तसेच इतर दैनंदिन कामकाजावर परिणाम होऊन नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे शासनाने महसूलसेवकांना त्वरित चतुर्थ श्रेणीचा दर्जा देऊन नागरिकांची त्रासातून सुटका करण्याचे आवाहन विदर्भ महसूलसेवक संघटना जिल्हा शाखा चंद्रपूरचे जिल्हाध्यक्ष दयाराम वंजारी यांनी केले.

चंद्रपूर जिल्ह्यातील २१८ महसूलसेवक या कामबंद आंदोलनात सहभागी असून संपूर्ण राज्यातील महसूलसेवक आंदोलनात सहभागी आहेत. त्यामुळे तात्काळ महसूलसेवकांच्या मागण्या पूर्ण कराव्यात, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंककरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.





# 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' मोहिमेंतर्गत मौशी येथे महिलांची आरोग्य तपासणी



नागभीड/प्रतिनिधी

महिलांचे आरोग्य हेच एका सशक्त कुटुंबाचे व समाजाच्या प्रगतीचे भक्कम आधारस्थान आहे. राष्ट्रीय स्तरावरील 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या विशेष मोहिमेचा शुभारंभ उत्साहात झाला. प्राथमिक आरोग्य केंद्र मौशी रुग्णालयात दिनांक १८/९/२५ रोजी पार पडलेल्या या उद्घाटन सोहळ्यास महिलांचा आणि कुटुंबियांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या उपक्रमाचे उद्घाटन सरपंच नलिनी ठाकरे यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी येथील डॉ. ओमप्रकाश ढोंगे सर जनरल फिजीसियन, डॉ केतकी लांजेवार मॅडम बाल रोग तज्ञ, डॉ सेलोकर सर स्त्री रोग तज्ञ, डॉ काळे सर बाल रोग तज्ञ, डॉ विनोद मडावी सर तालुका आरोग्य अधिकारी,डॉ सागर माकडे वैधकीय अधिकारी, डॉ नेहा बोडणे वैधकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात महिलांची विविध तपासण्या करून आरोग्य सेवेचा लाभ घेतला. त्यामध्ये योगासत्र -१५०, किशोरवयीन मुलींना समुपदेशन - ६९, पोषण आहार समुपदेशन - १६२, असंसर्गजन्य तपासणी १६२, गरोदर माता -४८, बालकांची तपासणी -४२, क्षयरोग समुपदेशन - १६२, X-Ray-१२४, प्रयोगशाळा तपासणी (थायरॉईड, हिमोग्लोबिन, सिकलसेल इ.) - १६२ , कर्करोग (तोंड, गर्भाशय व स्तन तपासणी) ११०, Ecg -५७, आभा कार्ड, pmjay -१८, निश्चय मित्र -१६ अशा सर्व महिलांची तपासणी करण्यात आली. ही मोहीम गावागावांत २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत अशा शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे.

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404